आवृत्ती-२

# असुरक्षितता मापनाबाबतची नियमपुस्तिका २०२३

## भारत निवडणूक आयोग

## Election Commission of India

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

# असुरक्षितता मापनाबाबतची

# नियमपुस्तिका २०२३

## भारत निवडणूक आयोग

## Election Commission of India

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

## प्रास्ताविक

निवडणूक प्रक्रियेत मतदारांच्या निर्भयी आणि निर्विघ्न सहभागाची सुनिश्चिती करण्यातील एक अविभाज्य भाग म्हणून असुरक्षितता मापनाची संकल्पना उदयास आली आहे. २००७ पासून निवडणूक आयोगाने, या संकल्पनेचा प्रभावीपणे उपयोग केला आहे. आयोगाच्या यापूर्वीच्या सर्व अनुदेशांचा उपयोग करून या माहिती पुस्तिकेमध्ये असुरक्षितता, त्याबाबतचे नियोजन, आणि प्रत्यक्ष कार्यान्वयन या घटकांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या माहिती पुस्तिकेत भविष्यातील सर्व निवडणुकांमध्ये वापर करण्यासाठी अधिकच्या सूचनांसह यापूर्वीच्या सर्व अनुदेशांचे एकत्रीकरण केले आहे.

## अनुक्रमणिका


| क्रमांक (१) | आशय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | असुरक्षितता मापन .. .. .. .. | १ |
| २ | कायदेशीर चौकट .. .. .. .. | १ |
| ३ | असुरक्षितता मापनाचे अनुदेश .. .. .. .. | १-२ |
| ४ | असुरक्षितता मापन (व्हीएम) वापर करण्याचे तीन टप्पे .. .. .. | २ |
| ५ | असुरक्षिततेचे परिमाणे .. .. .. .. | २-३ |
| ६ | असुरक्षितता मापनाकरिता करावयाची कार्यवाही .. .. .. | ३-१० |
| | (क) योग्य क्षेत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या जबाबदाऱ्या .. .. | ३-४ |
| | (ख) पोलीस ठाणे स्तरावर क्षेत्र पोलीस अधिकारी व पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती .. | ५ |
| | (ग) क्षेत्र अधिकारी व पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण .. .. | ५ |
| | (घ) असुरक्षित क्षेत्रे/खंड/गावे/वाड्या निश्चित करणे .. .. .. | ५-६ |
| | (ङ) अशा असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्तीं निश्चित करणे .. .. | ६ |
| | (च) असुरक्षिततेसाठी कारणीभूत असलेल्या व्यक्तींविरूद्ध करावयाची कारवाई .. | ६-७ |
| | (छ) निश्चित केलेल्या असुरक्षित क्षेत्रांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या उपाययोजना .. | ७ |
| | (ज) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलासाठी क्षेत्र वर्चस्व योजना आणि मतदानाच्या दिवशीच्या नियुक्ती .. | ७-८ |
| | (झ) मतदानाच्या दिवशी असुरक्षित क्षेत्रे/व्यक्तींचे संनियंत्रण करणे .. .. | ८ |
| | (ञ) मतदानानंतर निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी/निरीक्षक यांची भूमिका. . | ८ |
| | (ट) उत्तरदायित्व आणि गोपनीयता .. .. .. .. | ९ |
| | (ठ) अहवालाची प्रपत्रे .. .. .. .. | ९-१० |
| | (ड) राज्याचे कायदा व सुव्यवस्था पोर्टल कार्यान्वित करणे .. .. | १० |
| ७ | असुरक्षितता मापनाची कालमर्यादा .. .. .. .. | १०-११ |


### जोडपत्रे


| | | |
|---|---|---|
| (एक) | व्हीएम १- असुरक्षितेचे मापन करण्याचे काम हाती घेण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे त्याला/तिला (क्षेत्र अधिकाऱ्याला) द्यावयाची प्रत्येक विधानसभा मतदारासंघाची, प्रभागाची माहिती. | १२-१३ |
| (दोन) | असुरक्षितता मापन २ (क्षेत्र अधिकारी) : क्षेत्र अधिकाऱ्याने (मतदान केंद्रनिहाय) असुरक्षिततेचे मापन निर्धारित करण्यासाठीचे प्रपत्र. | १४-१६ |
| (तीन) | असुरक्षितता मापन ३ (क्षेत्र अधिकारी) : क्षेत्र अधिकाऱ्याने द्यावयाचा असुरक्षित ठिकाणे/क्षेत्रखंड /मतदार प्रभाग आणि दहशत पसरवणाऱ्या व्यक्तींच्या यादीचा मतदान केंद्रनिहाय सारांश क्षेत्रनिहाय. | १७ |
| (चार) | असुरक्षितता मापन ४ (निवडणूक निर्णय अधिकारी) : निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने द्यायवयाची असुरक्षितता आणि असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींची यादी याचा सारांश (विधानसभा मतदार संघनिहाय). | १८ |
| (पाच) | असुरक्षितता मापन ५ (जिल्हा निवडणूक अधिकारी) : असुरक्षिततेचे निर्धारण आणि जिल्हा स्तरावर करण्यात आलेल्या कारवाईबाबतचा अहवाल (जिल्हानिहाय). | १९ |
| (सहा) | असुरक्षितता मापन ६ (मुख्य निवडणूक अधिकारी) : राज्याचा असुरक्षिततबाबतचा अहवाल. | २० |

## संक्षेपाक्षरे (ABBREVIATIONS)

| | | |
|---|---|---|
| AC | Assembly Constituency | विधानसभा मतदारसंघ |
| ARO | Assistant Returning Officer | सहायक निवडणूक निर्णय अधिकारी |
| ASI | Assistant Sub Inspector | सहायक उप निरीक्षक |
| ATR | Action Taken Report | केलेल्या कार्यवाहीचा अहवाल |
| CEO | Chief Electoral Officer | मुख्य निवडणूक अधिकारी |
| CAPF | Central Armed Police Force | केंद्रीय सशस्त्र पोलीस दल |
| DEO | District Election Officer | जिल्हा निवडणूक अधिकारी |
| DM | District Magistrate | जिल्हा दंडाधिकारी |
| DPO | Designated Police Officer | पदनिर्देशित पोलीस अधिकारी |
| DSP | Deputy Superintendent of Police | पोलीस उप अधीक्षक |
| ECI | Election Commission of India | भारत निवडणूक आयोग |
| EPIC | Electoral Photo Identity Card | मतदार छायाचित्र ओळखपत्र |
| LIB | Local Inteligence Bureau | स्थानिक गुप्तवार्ता केंद्र |
| LOR | Law and Oder Report | कायदा व सुव्यवस्था अहवाल |
| LWE | Left Wing Extremism | डाव्या विचारसरणीचे जहालमतवादी |
| MCC | Model Code of Conduct | आदर्श आचारसंहिता |
| NBW | Non Bailable Warrant | बिनजामिनी अधिपत्र/बेजमानती वॉरंट/अजामिनपात्र अधिपत्र |
| PCCP | Patrolling cum Collection Parties | गस्ती नि वसुली पथके |
| PI | Police Inspector | पोलीस निरीक्षक |
| PS | Polling Station | मतदान केंद्र |
| RO | Returning Officer | निवडणूक निर्णय अधिकारी |
| SDM | Sub-divisional Magistrate | उपविभागीय दंडाधिकारी |
| SDPOs | Sub-divisional Police Officers | उपविभागीय पोलीस अधिकारी |
| S.O | Sector Officer | क्षेत्र अधिकारी |
| SOP | Standard Operating Procedure | प्रमाणित कार्यचालन प्रक्रिया |
| SP | Superintendent of Police | पोलीस अधीक्षक |
| SPO | Sector Police Officer | क्षेत्र पोलीस अधिकारी |
| TDO | Taluka Development Officer | तालुका विकास अधिकारी |
| UT | Union Territory | संघ राज्यक्षेत्र |
| VM | Vulnerability Mapping | असुरक्षितता निश्चिती, असुरक्षिततेचे मापन |

# असुरक्षितता मापनाबाबतची नियमपुस्तिका

## १. असुरक्षितता मापन

निवडणुकीच्या संदर्भात असुरक्षितता याची व्याख्या कोणत्याही मतदाराला किंवा गटाला रोख रकमेच्या/वस्तुच्या रूपात लाच देणे किंवा धाकदपटशा दाखवून किंवा गैरवाजवी प्रभावाचा वापर करून किंवा कोणत्याही प्रकारचा बळाचा वापर करून, त्याद्वारे मुक्त व निष्पक्ष रीतीने मतदान करण्याचा त्यांचा हक्काचा वापर करण्यापासून अन्यायपणे प्रतिबंध करण्यात येत असल्याची किंवा त्याच्यावर प्रभाव टाकला जात असल्याची कोणत्याही मतदाराची किंवा मतदारांच्या वर्गाची विवशता होय, अशी करता येईल.

निवडणुकीच्या संदर्भात असुरक्षितता मापनाचा वापर, जे असुरक्षित असण्याची शक्यता आहे, अशा मतदारांना किंवा मतदारांच्या वर्गाला अगोदरपासून ओळखणे अशी असुरक्षिततेस कारणीभूत लोक किंवा अन्य घटक आणि अशाप्रकारे त्यांना निश्चित केल्याच्या आधारावर पुरेशा अगोदरच सुधारात्मक कार्यवाही हाती घेण्यात येणार याच्या उद्देशाने केला जाणार आहे.

## २. कायदेशीर चौकट

(क) भारतीय दंड संहितेचे कलम १७१ ख. (१) जी कोणी—

(एक) कोणत्याही व्यक्तीला कोणताही निवडणूकविषयक हक्क वापरण्यासाठी तिला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याच्या अथवा असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला बक्षिशी देण्याच्या हेतूने परितोषण देतो ; अथवा,

(दोन) असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल अथवा असा कोणताही हक्क वापरण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याबद्दल किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल बक्षिशी म्हणून कोणतेही परितोषण स्वतः करता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता स्वीकारतो, त्याने लाचलुचपतीचा अपराध केला असे होते :

परंतु, लोक धोरण जाहीर करणे किंवा लोकोपयोगी कारवाईचे वचन देणे हा या कलमाखाली अपराध होणार नाही.

(ख) भारतीय दंड संहितेचे कलम १७१ ग—निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे हा भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ग अन्वये एक निवडणूक अपराध आहे. कोणत्याही निवडणुकाविषयक हक्काच्या मुक्त वापरात कोणताही इच्छापूर्वक अडथळा किंवा अडथळा करण्याचा प्रयत्न निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याचा अपराध केला आहे असा होतो.

(ग) लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम १२३ (२)—हे कलम एखाद्या उमेदवारांने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवारांच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तींने कोणत्याही निवडणूक विषयक अधिकारांच्या मुक्त वापरामध्ये, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करणे किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रत्यत्न करणे भ्रष्टाचारी प्रथा असल्याचे स्पष्ट करते.

याशिवाय, भारतीय दंड संहितेच्या इतर विविध संबंधित तरतुदी अंमलबजावणी अभिकरणांद्वारे असुरक्षितता निर्माण करणाऱ्या अशा अपराधांवर लागू केल्या जाऊ शकतात.

## ३. असुरक्षितता मापनावरील अनुदेश

निवडणुकीत बळाचा वापर होत असल्याने त्याची योग्य ती दखल घेऊन आणि निवडणूक राजकारणात सामाजिक–आर्थिक वास्तवतेचे दर्शन घडविण्यात येत असल्यामुळे, निवडणूक आयोगाने ' असुरक्षितता मापन ' या यंत्रणेची सन २००७ मध्ये सुरूवात केली आहे. या पाठोपाठच अशा धमकी व धाकदपटशासाठी दुबळ्या घटकातील मतदान केंद्रामधील असे क्षेत्र ओळखून त्याद्वारे निवडणुकीच्या वेळी धमकी व धाकदपटशा देण्याचे संकट ओळखून त्यावर प्रतिबंध करण्यासाठी अनुदेशांची एक श्रृंखला निर्गमित करण्यात आली आहे.

तथापि, अलीकडच्या काळात प्रचलित सामाजिक–आर्थिक परिस्थितीमुळे बळाच्या वापराबरोबरच पैसा देखील मतदारांवर अवाजवी प्रभाव टाकणारा एक महत्वपूर्व घटक बनला आहे. अशा तऱ्हेने, नैतिक मतदानाविषयी कमी जागरूकता असलेले आर्थिकदृष्टया मागास घटकांचे क्षेत्रखंड असू शकतात ज्यांचे असुरक्षितता मापना दरम्यान बारकाईने निरीक्षण केले जाऊ शकते. याबाबत, **आयोगाने असुरक्षितता मापन, अतिसंवेदनशील मतदान केंद्रे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना या संदर्भात दिनांक २१ जून २०२३ रोजी एकत्रितरीत्या अनुदेश क्रमांक ४६४/एल अँड ओ/२०२३/इपीएस (व्हीएम) दिनांक २१ जून २०२३ निर्गमित केले आहेत.**

असुरक्षितता मापनाचे साधन त्याच्या सुरूवातीपासूनच परिणामकारकरीत्या वापरले जात आहे आणि उदयोन्मुख आवश्यकतांच्या आधारे, त्यात वेळोवेळी सुधारणा/अनुकूलन करण्यात आले आहे. सर्व सार्वत्रिक निवडणुका, संसदीय आणि विधानसभा निवडणुकांमध्ये हे

साधन वापरण्याच्या पंधरा वर्षांच्या अनुभवानंतर असुरक्षितता मापनाची ही यंत्रणा आता संस्थात्मक झाली आहे. या अनुभवांतून आणि देशभरातल्या सर्वोत्तम पद्धतीद्वारे शिकून, भारत निवडणूक आयोगाद्वारे असुरक्षितता मापनाबाबत निर्गमित केलेल्या या अनुदेशांचे, आता या क्षेत्रामध्ये अधिक प्रभावी रीतीने उपयोजन करण्यासाठी या माहिती पुस्तकाच्या स्वरूपामधील एका पद्धतशीर आराखड्यामध्ये एकत्रिकृत व संवर्धित करण्यात आले आहे.

**४. असुरक्षितता मापनाचा (व्हीएम) वापर करण्याचे तीन टप्पे**

मतदान होणाऱ्या सर्व मतदारसंघामध्ये निरपवादरीत्या असुरक्षितता मापनाची (व्हीएम) वापर करण्यात येईल. व्हीएमचा वापर तीन टप्प्यात होतो :

(एक) असुरक्षित किंवा अवाजवी प्रभावाचा धोका असलेल्या मतदार/मतदार खंड, गाव/वाड्या यांना क्षेत्रनिहाय निश्चित करणे.

(दोन) शारीरिक बळाचा/पैशाच्या शक्तीचा वापर करून अशी असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्तींची ओळख पटविणे.

(तीन) असुरक्षिततेस कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींविरूद्ध प्रतिबंधात्मक उपोययोजना सुरू करणे.

**५. असुरक्षिततेची परिमाणे**

प्रत्येक जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने त्याच्या/तिच्या जिल्ह्यात/मतदारसंघात असुरक्षिततेच्या घटकांशी संबंधित वर्तमान आणि मागील नोंदीच्या आधारावर माहिती गोळा करणे आवश्यक आहे. व्हीएम-१ (जोडपत्र-एक) असुरक्षितेवरील माहिती गोळा करण्यासाठी परिमाणांचा एक संच उपलब्ध करून देते. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने प्रत्येक विधानसभा खंडाच्या निवडणूक निर्णय अधिकारी/उप जिल्हा दंडाधिकारी यांच्याद्वारे मागील सार्वत्रिक निवडणुकीसाठी निर्धारित मतदानाच्या दिनांकाच्या कमीत कमी सहा महिने आधी अशी माहिती एकत्र केली पाहिजे आणि त्यानंतर ही माहिती अद्ययावत ठेवली पाहिजे. असुरक्षितता मापनाच्या अभ्यासासाठी क्षेत्र अधिकाऱ्याच्या नियुक्तीनंतर (मागील सार्वत्रिक निवडणुकीच्या दिनांकाच्या चार महिने आधी) त्याला/तिला ही माहिती देणे आवश्यक आहे. असुरक्षितता मापनासाठी क्षेत्र अधिकारी व क्षेत्र पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या भूमिका, जबाबदाऱ्या आणि उपक्रमांच्या कालमर्यादेबाबत सुयोग्य प्रशिक्षण देण्यात येईल.

असुरक्षितता मापनाचा वापर करताना आणि क्षेत्र अधिकाऱ्यांना संक्षिप्त स्वरूपात लेखी माहिती देताना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने विचारात घेतलेल्या इतर महत्वाच्या परिमाणांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :—

**(क) मतदानपूर्व तक्रारी** :—मतदानपूर्व तक्रारी ह्या असुरक्षितता मापनाबाबतची महत्त्वपूर्व माहिती म्हणून लक्षात घेतल्या जाऊ शकतात. तक्रारी अनेक बाबतीत महत्वपूर्व असतात.

मतदानाच्या दिवसापूर्वी राजकीय स्पर्धात्मकतेची खोली दर्शविणारी ती एक थेट प्रक्रिया आहे. तक्रारी ह्या नेहमीच खऱ्या असतील असे नाही. तथापि, निवडणूक यंत्रणेद्वारे खऱ्या म्हणून पडताळणी केलेल्या तक्रारींची संख्या आणि स्वरूपाला असुरक्षिततेचे निदर्शक म्हणून मानले जाऊ शकते. मतदानपूर्व तक्रारींना सामान्यपणे दोन बाजू असतात. एक आदर्श आचारसंहितेशी संबंधित आहे. ज्यामध्ये मतदारांना रोख रक्कम/वस्तूरूपात लाच देण्यासाठी पैशाचा दुरूपयोग समाविष्ट आहे आणि दुसरी म्हणजे विविध स्वरूपाच्या राजकीय प्रतिस्पर्धांशी संबंधित आहे जे प्रामुख्याने राजकीय पक्षांच्या नेत्यांद्वारे राजकीय आधार टिकवून ठेवणे/एकत्रित करणे/ हरवण्याशी संबंधित आहे. वास्तविक, दुसऱ्या प्रकाराची क्रिया ही मतदानाच्या दिवसाच्या खूप आधीपासून सुरू होते. तक्रारी म्हणजे निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय पक्षांना जाणवणाऱ्या धक्क्यांचे प्रकटीकरण होय. त्यामुळे, तक्रारींची संख्या आणि स्वरूप विचारात घेणे गरजेचे आहे.

**(ख) राजकीय पक्षांची कृती** :—मतदानापूर्वी, आदर्श आचारसंहितेच्या प्रकरणांच्या उल्लंघनाशी संबंधित तक्रारींची संख्या देखील महत्त्वाची आहे. अनुभव हे सांगतो की राजकीय पक्ष खाजगी मालमत्तेवर भिती लिखाणासाठी घरमालकांची परवानगी घेण्यास नाखूष असतात. ग्रामीण भागात ते जवळजवळ गृहीतच धरले जाते. मतदार राजकीय पक्ष, विशेषतः सत्ताधारी राजकीय पक्ष म्हणवल्या जाणाऱ्या बहुसंघाटित संस्थेविरूद्ध आवाज उठवण्याचे धाडस करू शकत नाहीत. त्यामुळे मतदारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. यासंदर्भात, आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या प्रवृत्तीचा मतदान केंद्राच्या असुरक्षिततेवर जोरदार परिणाम होतो आणि म्हणून असुरक्षिततेचे मापन करताना ही बाब विचारात घेण्यात येईल.

**(ग) मागील निवडणुकांमधील मतदानाची टक्केवारी** :—कमी/जास्त मतदानाच्या एकूण प्रमाणाची प्रकरणे तपासली जावीत आणि असुरक्षिततेला कारणीभूत ठरणारे घटक, असल्यास, ते समजून घेण्यासाठी त्यांचे विश्लेषण केले पाहिजे. अल्पसंख्यांक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर असुरक्षित वर्ग आणि समाजविघातक घटकांचे वर्चस्व हे त्या क्षेत्रातील असुरक्षिततेच्या प्रश्नाचे मूल्यांकन करण्यासाठी विचारात घेतले पाहिजे.

क्षेत्र अधिकारी मतदान केंद्राला/केंद्राना भेटी देताना असुरक्षित क्षेत्रे तपासण्यासाठी आणि निश्चित करण्यासाठी विशेषतः डाव्या विचारसरणीच्या जहालमतवादी नसलेल्या क्षेत्रांत प्रपत्र व्हीएम-२ (जोडपत्र-दोन) वापरतील.

क्षेत्र अधिकाऱ्याच्या असुरक्षिता मापन (व्हीएम) अहवालांव्यतिरिक्त, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने पुढील बाबींची ही खात्री करणे अनिवार्य आहे.

**(घ) असुरक्षितता अहवालाची उलटतपासणी** :—उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या (एसडीएम) सापेक्षतेने उच्च स्तरावरील माहिती गोळा करण्यासाठी, उलटतपासणी आणि पडताळण्यासाठी अतिरिक्त यंत्रणा असली पाहिजे. यामध्ये उप-विभागीय पोलीस अधिकारी/ इतर स्त्रोत/जिल्हा गुप्तवार्ता माहिती यांच्याकडून काही अधिक माहिती घेता येईल, जेणेकरून असुरक्षितता मापनाची योजना अधिक तर्कसंगत व वास्तववादी होईल. सर्वसाधारण विधानसभा निवडणुकांदरम्यान उप-विभागीय दंडाधिकारी त्यांच्या उप-विभागीय क्षेत्राधिकाराअंतर्गत विधानसभा मतदारसंघांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमवेत समन्वय साधतील.

**(ङ) माहिती गोळा करण्याचे इतर मार्ग** :—आयोगाने असे अनुदेश निर्गमित केले आहेत की, जिल्हा निवडणूक अधिकारी सर्वांगींण दृष्टिकोन बाळगण्यासाठी असुरक्षिततेच्या मापनासाठी राजकीय पक्ष/उमेदवाराद्वारे वाटणाऱ्या प्रस्तुत चिंता/काळजी वाटणाऱ्या याद्यांचा विचार करेल. राजकीय पक्ष/उमेदवारांकडून प्राप्त माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्यावरच्या स्तरापर्यंत जाण्यापूर्वी उप जिल्हा दंडाधिकारी स्तरावर (आणि त्यापेक्षा कमी दर्जाचे नाही) प्रमाणित केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे मतदारांकडून जे निवडणुकांतील सर्वात मोठे हितसंबंधी भागीदार आहेत, माहिती गोळा करण्यासाठी मदत कक्ष संपर्क (कॉल सेंटर) नियंत्रण कक्षाद्वारे एक मार्ग (चॅनल) तयार करण्यात येईल. जिल्हा पोलीसांच्या जिल्हा गुप्तवार्ता शाखेकडूनही माहिती घेण्यात येईल.

असुरक्षितता अहवालाच्या विश्वनियतेची खात्री करण्यासाठी तुलनेने उच्च प्रशासकीय/पोलीस स्तरावर माहिती गोळा करणे, उलटतपासणी, प्रमाणीकरण करणे आणि संकलन करून पडताळणी करण्याच्या यंत्रणेची खात्री करण्यात येईल.

**६. असुरक्षितता मापनाकरिता करावयाची कार्यावाही**

**(क) योग्य क्षेत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या जबाबदाऱ्या.—**

(क) नियुक्ती प्रक्रिया :—भूप्रदेश आणि मनुष्यबळ संसाधनांच्या उपलब्धतेच्या आधारावर, आयोगाच्या निदेशांनुसार, एका क्षेत्र अधिकाऱ्याची एक ते दोन तासांत भेट देणे शक्य होईल अशा १० ते १२ मतदान केंद्रांवर देखरेख करण्यासाठी नियुक्ती करण्यात येणार आहे. क्षेत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती मागील सार्वत्रिक निवडणुकीच्या दिनांकाच्या चार महिने आधी करण्यात येईल. कारण हे सर्वात जबाबदार पदांपैकी एक पद असल्यामुळे, सर्वोत्तम अधिकाऱ्यांची निवड करणे क्रमप्राप्त आहे. आवश्यक वाटल्यास केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याचीही नियुक्ती केली जाऊ शकते.

प्रत्येक १०-१२ मतदान केंद्रांतर्गत समाविष्ट असलेल्या विशिष्ट क्षेत्रांशी संबंधित असुरक्षितता मापनाचे (व्हीएम) काम पाहण्यासाठी क्षेत्र अधिकारी नियुक्ती केले जातात याची नोंद घ्यावी. म्हणून हे १०-१२ मतदान केंद्राची स्थाने आहेत असा अन्वयार्थ काढण्यात येऊ नये. निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर मतदान प्रक्रियेपर्यंत क्षेत्र अधिकाऱ्यांना मतदानाच्या दिवसाच्या कमीत कमी ७ दिवस आधी त्याच क्षेत्राकरिता क्षेत्रदंडाधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल.

त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकारही प्रदान करण्यात येतील. मुख्य निवडणूक अधिकारी विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकार प्रदान करण्याच्या सुविधेकरिता राज्य शासनाशी विचारविनिमय करून योग्य ती कार्यवाही करील.

(ख) मतदानपूर्व जबाबदाऱ्या :—

क्षेत्र अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या

| | |
|---|---|
| मतदानपूर्व | ● असुरक्षिततता मापनाशी संबंधित |
| मतदानाच्या दिवशी | ● मुक्त व निष्पक्ष निवडणुकीकरिता |

असुरक्षिता मापनाशी संबंधित क्षेत्र अधिकाऱ्यांच्या मतदानपूर्व जबाबदाऱ्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :—

(एक) कालमर्यादेस अनुसरून असुरक्षिततता मापनाचा (व्हीएम) वापर करणे.

(दोन) विश्वासार्हता वाढविण्याच्या उपाययोजनांसाठी आणि असुरक्षिततता मापनात सुयोग्य ताळमेळ साधण्यासाठी वारंवार भेटी देणे. (किमान तीन).

(तीन) धमकी व धाकदपटशाबाबत गावे, वाडे आणि खंडांमधील असुरक्षित मतदार निश्चित करणे.

(चार) असुरक्षिततता निर्माण करणाऱ्या व्यक्ती शोधून काढणे हे संख्यांच्या बाबतीत नसून नावांच्या बाबत आहे स्त्रोत उघड न करता निवडणूक निर्णय अधिकारी/उप जिल्हा दंडाधिकारी यांना विहित प्रपत्रात माहिती देण्यात यावी.

(पाच) मतदानासाठी मतदारांच्या मुक्त प्रवेशाची खात्री करण्यासाठीची जबाबदारी.

(सहा) असुरक्षित समुदायाच्या अंतर्गत त्यांच्या दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकासह संपर्क खुणा.

(सात) क्षेत्र अधिकारी (अधिसूचनेनंतर) क्षेत्र दंडाधिकारी म्हणून काम करील. आणि त्याच्यासोबत एक पोलीस अधिकारी (क्षेत्र पोलीस अधिकारी) असावा.

(आठ) क्षेत्र अधिकारी क्षेत्रीय दंडाधिकारी म्हणून काम करील. तो मतदान केंद्रासाठी एक रेखाचित्र नकाशा, मतदान केंद्रे व निवडणुकीशी संबंधित अधिकाऱ्यांच्या दूरध्वनी क्रमांकांची सूची, पोलीस ठाण्यांची सूची, जबाबदार व्यक्तीची सूची समाज विघातक घटकांची सूची तयार करील.

(नऊ) असुरक्षित क्षेत्रांची ओळख पटविण्याकरिता श्रम निरीक्षक आणि अन्न व पुरवठा अधिकाऱ्यांसह बैठक घेणे.

(दहा) शैक्षणिक संस्थांच्या विशेषतः निवासी संस्थांच्या प्रमुखांसह बैठक

(अकरा) कारखाना/गोदाम मालकांसह आंतरक्रिया.

(बारा) विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी निवासी कल्याण संघांशी/ग्राम प्रधान/सरपंच यांसह बैठक.

(तेरा) नियतक्षेत्र शिपायासोबत (बीट कॉन्स्टेबल) माहितीची देवाणघेवाण.

(चौदा) मतदान केंद्र/क्षेत्राच्या भूगोलाबाबत ज्ञान.

(पंधरा) जात, पंथ आणि धर्माच्या आधारावर मतदारांचे वर्गीकरण निश्चित करणे.

(सोळा) मुद्रणालये चालवणाऱ्या व्यक्तीची ओळख.

(ग) मतदानाच्या दिवशीच्या जबाबदाऱ्या.—

मतदानाच्या दिवशी क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याने त्याच्या इतर मतदान दिवसांच्या जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त पुढील कामे करणे अपेक्षित आहे :—

(एक) पूर्वी ओळखले गेलेले असुरक्षित वर्ग मतदान करत आहेत की नाही याची वारंवार तपासणी करणे.

(दोन) यासंबंधात कोणताही इशारा प्राप्त होताच त्याने/तिने ताबडतोब निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा प्रशासनाला सतर्क करणे.

(तीन) तो भरारी पथकांच्या मदतीनेही असुरक्षित वर्गावर लक्ष ठेवणे.

वर वर्णन केलेल्या कृती केवळ उदाहरणात्मक (निदर्शी) आहेत. स्थानिक संवेदनशीलतेच्या आधारे जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी असुरक्षितता मापनाच्या प्रयोजनांसाठी आणखी काही कृती समाविष्ट करू शकतात.

**(ख) पोलीस ठाणे स्तरावर क्षेत्र पोलीस अधिकारी व पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती.—**

प्रत्येक पोलीस ठाण्या अंतर्गत विधानसभा मतदारसंघाचा एक विवक्षित भाग समाविष्ट असतो. असुरक्षितता मापनाच्या प्रयोजनाकरिता; जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक एका पोलीसाची व्यवस्था करील, जो क्षेत्र पोलीस अधिकारी म्हणून काम पाहिल, क्षेत्र अधिकाऱ्यासोबत राहील आणि दिलेल्या क्षेत्रात असुरक्षितता मापणाचे काम संयुक्तपणे पार पाडील. क्षेत्र पोलीस अधिकारी हा सहायक उप-निरीक्षक किंवा पोलीस हवालदार याहून कमी दर्जाचा नसेल.

वैयक्तिक रीत्या त्रास देणाऱ्यांचा मागोवा घेण्यासाठी आणि त्रास देणाऱ्यांवर नजर ठेवली जाईल याची खात्री करण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था योग्य प्रकारे राखण्याची आणि शांततापूर्व रीतीने मतदान पार पडण्यासाठी ठाणे (पोलीस स्टेशन) स्तरावर एक विशिष्ट अधिकारी नियुक्त करण्यात येईल. त्यास असुरक्षिता मापनाकरिता पदनिर्देशित पोलीस अधिकारी संबोधण्यात येईल. प्रत्येक विधानसभा खंडाचे निवडणूक निर्णय अधिकारी/उप-जिल्हा दंडाधिकारी हे क्षेत्र अधिकारी व ह्या पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्यांशी समन्वय साधतील.

**(ग) क्षेत्र अधिकारी व पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण.—**

क्षेत्र अधिकारी आणि पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्यांना त्यांची कर्तव्ये सुरळीतपणे पार पाडता यावीत यासाठी पुढील बाबींबाबत चांगल्या प्रकारे प्रशिक्षण देण्यात येईल. त्यांना संयुक्तिकरीत्या प्रशिक्षण देण्यात येईल आणि प्रशिक्षणादरम्यान प्रत्येकाला पुढील तपशील उपलब्ध करुन देण्यात येईल :—

(क) त्यांना त्यांच्या भागाच्या प्रत्येक वर्गातील मतदारांशी संपर्क करण्यास सक्षम करण्यासाठी पाड्यांची नावे इत्यादीसह प्रत्येक मतदान केंद्राची मतदार यादी

(ख) मतदान केंद्रनिहाय आश्वासित किमान सुविधा (एएमएफ)

(ग) विधानसभा मतदारसंघाचे आणि त्या क्षेत्रातील मतदान केंद्रांचे मतदानाचे प्रमाण (मागील २ सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(घ) स्त्री-पुरुष प्रमाण

(ङ) त्या क्षेत्रातील आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाची प्रकरणे

(च) त्यांच्या क्षेत्राचा एक मार्ग नकाशा, ज्यामध्ये त्यांच्या क्षेत्रात येणाऱ्या मतदान केंद्रांचा बृहत् आराखडा आणि ठिकाण दिले गेले असेल. (हा एक रेखाचित्र नकाशा असू शकतो, रेखाचित्र नकाशा असण्याची गरज नाही) आणि

(छ) असुरक्षितता मापन-१ (जोडपत्र-एक) अनुसार इतर तपशील.—

त्यांचा संयुक्त भेट कार्यक्रम तयार करण्यात येईल आणि प्रशिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन दिला जाईल. निवडणूक निर्णय अधिकारी व उप-विभागीय पोलीस अधिकारी त्याचप्रमाणे जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलीस अधीक्षक या अधिकाऱ्यांसह वेळेवेळी संयुक्त आढावा घेतील जेणेकरुन त्यांच्याद्वारे करण्यात आलेल्या असुरक्षितता मापनाच्या कामाचे नियंत्रण करता येईल आणि त्यांच्या संयुक्त भेटीदरम्यान ठळकपणे निदर्शनास आणलेल्या मुद्यांवर करण्यात आलेल्या कारवाईचे पुनर्विलोकन करता येईल.

**(घ) असुरक्षित क्षेत्रे / खंड / गावे / वाड्या यांची निश्चिती करणे**

(क) असुरक्षितता मापनाचा पहिला टप्पा म्हणजे क्षेत्र अधिकाऱ्याने त्याच्या नियुक्तीनंतर लगेचच त्याच्या क्षेत्रातील अशा भागांना वारंवार भेट देणे (किमान तीन) होय. क्षेत्र अधिकारी आणि हवालदार / सहायक उप-निरीक्षक / पोलीस अधिकारी संयुक्तरीत्या क्षेत्रास भेट देतील.

(ख) त्यांच्याकरिता दौऱ्यांचा कार्यक्रम निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलीस उप-अधीक्षक / उप-विभागीय पोलीस अधिकारी यांच्याद्वारे संयुक्तरीत्या ठरविण्यात येईल.

(ग) क्षेत्र अधिकारी त्याच्या / तिच्या क्षेत्रातील प्रत्येक मतदान केंद्राच्या प्रत्येक परिसराला / वस्त्यांना अनिवार्यपणे भेट देईल स्थानिक लोकांशी विस्तृत रीतीने चर्चा करील, गोपनीय माहिती गोळा करील आणि तेथे असुरक्षिततेस कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्ती व घटकांबरोबरच असुरक्षित घरकुले आणि कुटुंबे यांची यादी तयार करील.

(घ) हे करत असताना, तो/ती भूतकाळातील घटना व वर्तमानकाळातील आशंका या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत.

(ङ) आयोगाने निवडणूक जाहीर करताच, क्षेत्र अधिकारी अशा क्षेत्रास भेट देईल आणि प्रपत्र व्हीएम-२ (जोडपत्र-दोन) आणि व्हीएम-३ (जोडपत्र - तीन) मध्ये माहिती तयार करील.

(च) स्थानिक पोलीस अधिकारी आणि स्थानिक नागरी प्राधिकारी असे की, तालुका विकास अधिकारी / मामलेदार / पोलीस निरीक्षक इ. यांचाही सल्ला घेण्यात येईल आणि त्यांनी दिलेली माहिती विचारात घेण्यात येईल.

(छ) प्रपत्र व्हीएम-२ (जोडपत्र-२) केवळ सक्षमकर्त्याच्या रुपात आहे आणि एकत्र करण्यात आलेली माहिती एवढ्यापुरतीच मर्यादित राहू शकत नाही. जर मतदान केंद्राच्या असुरक्षिततेवर प्रभाव पडत असेल तर अतिरिक्त माहिती जोडण्यात येईल.

(ज) मतदार संघामध्ये सर्वसाधारण निरीक्षक, पोलीस पर्यवेक्षक आणि खर्च निरीक्षक यांचे आगमन झाल्यावर, जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित विधानसभा मतदारसंघाचा मतदानकेंद्र निहाय असुरक्षितता मापनाचा तपशील व्हीएम-४ (जोडपत्र-चार) व व्हीएम-५ (जोडपत्र-पाच) मध्ये आणि संवेदनशील मतदान केंद्रांची सूची निरीक्षकांकडे सोपवतील. सर्वात वरिष्ठ सर्वसाधारण निरीक्षक व पोलीस पर्यवेक्षक अंतिम सूचीला मान्यता देतील.

(झ) निरीक्षकही अशा ठिकाणांना भेट देईल आणि मतदारांशी संवाद साधील आणि घडामोडींवर सातत्याने लक्ष ठेवील.

**(ङ) असुरक्षिततेस कारणीभूत व्यक्ती निश्चित करणे.—**

जोडपत्र-१, व्हीएम-१, मध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिताच्या आधारावर, क्षेत्र अधिकाऱ्यासह क्षेत्र पोलीस अधिकारी नियमित अंतराने क्षेत्र भेटी देतील आणि असुरक्षितता मापनावर माहिती देतील आणि धमकी, धाकदपटशा किंवा अवाजवी प्रभावाबाबत मतदार / मतदार खंडाची निश्चिती करतील. मतदार / गावांना असुरक्षित बनविण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींची ओळख पटवण्याचे काम मतदान केंद्रनिहायरित्या करण्यात येईल ज्यामध्ये गावाचे नाव, पाडे, संभाव्य समस्या निर्माण करणाऱ्यांची नावे, त्यांच्या पत्त्यासह आणि इतर बाबींचा समावेश असेल हे काम माहिती देणाऱ्या / स्त्रोतांची संपुर्ण गोपनीयता राखून, हवे असल्यास करावे लागेल.

**(च) असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्तींविरुद्ध कारवाई.—**

(क) जिल्ह्याचा जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलीस अधीक्षक या विषयावर एक संयुक्त आढावा घेतील आणि निश्चित करण्यात आलेले संभाव्य धोके व धाकदपटशा याबाबत कार्यवाही करण्यासाठी लक्षवेधी अंतिम कृती करतील. कृती आराखड्यात, इतर गोष्टींबरोबरच निश्चित करण्यात आलेल्या समस्या निर्माण करणाऱ्यांना कायद्याच्या योग्य कलमांतर्गत बंधन घालणे, बेकायदेशीर शस्त्रे जप्त करणे, प्रतिबंधात्मक स्थानबद्धता, त्यांच्या चांगल्या वर्तनाची खात्री करण्यासाठी ठराविक अंतराने स्थानिक पोलीस ठाण्यात त्यांची उपस्थिती अनिवार्य करणे, पोलीसांचे खांबांचे कुपंण लावणे व आत्मविश्वास निर्मिती करणाऱ्या उपाययोजना करणे यांचा समावेश असेल. मतदानाच्या दिवशी मतदारांना धाकदपटशा किंवा अडथळा होणार नाही याची खात्री करण्यासाठी शेवटच्या ७२ तासांत विशेष प्रयत्न केले पाहिजे.

(ख) अशा सर्व उपाययोजना कोणत्याही विशिष्ट पक्षाच्या बाजूने किंवा न घाबरता निरपेक्षपणे कोणताही पक्षाभिनिवेश न बाळगता करण्यात येतील याची खात्री करण्यात येईल.

(ग) असुरक्षित गटांमधील संपर्क व्यक्तींची नावेही निश्चित करण्यात येतील आणि त्यांचे संपर्क / भ्रमणध्वनी क्रमांक, असल्यास नोंदवले जातील.

(घ) वैयक्तिक त्रास देणाऱ्यांना मागोवा घेण्यासाठी आणि त्रास देणाऱ्यांवर नजर ठेवली जाईल याची खात्री करण्यासाठी, आधीच नमूद केल्याप्रमाणे, प्रत्येक ठाण्यात असुरक्षितता मापनासाठी पदनिर्देशित पोलीस अधिकारी नियुक्त करण्यात येईल.

(ङ) असुरक्षित मतदारांकडून मतदार छायाचित्र ओळखपत्र हिसकावून घेणे आणि लोकांना त्यांच्या मताधिकाराचा वापर करण्यापासून रोखण्यासाठी पैसे देऊन त्यांचे मतदार छायाचित्र ओखळपत्र जमा करण्यासाठी प्रलोभित करण्याच्या घटना रोखण्यात येतील. जिल्हा निवडणूक अधिकारी / पोलीस अधीक्षक / निवडणूक निर्णय अधिकारी परिस्थितीचे बारकाईने नियंत्रण करील आणि यासंबंधात तात्काळ सर्व योग्य अशी कारवाई करील.

(च) उप-विभागीय दंडाधिकारी / पोलीस उप-अधीक्षक त्रास देणाऱ्यांना व्यक्ती व्यक्तिशः नजर ठेवण्यात येईल अशा इशारा देतील. या कृती त्यावर लक्ष केंद्रीत करुन करण्यात येतील.

**(छ) निश्चित केलेल्या असुरक्षित क्षेत्रांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या उपाययोजना.—**

(क) क्षेत्र अधिकारी अशा क्षेत्रांना नियमितपणे भेट देईल आणि स्थानिक लोकांच्या संपर्कात राहील.

(ख) अशा क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करुन पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग उपक्रम (एसव्हीइपी) आणि जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात येतील.

(ग) अशा क्षेत्रांमध्ये दक्ष नागरिक (सी-व्हिजिल) आणि मतदार मदत क्रमांक १९५० यांसारखी महिती तंत्रज्ञानाची साधने लोकप्रिय आणि प्रसिद्ध करण्यात येतील.

(घ) स्थानिक लोकांच्या मनामध्ये हळूहळू आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक आणि निरीक्षक यासारख्या उच्च अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्यात.

(ङ)

(च) जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी नियमित अभिप्राय गोळा करण्यासाठी उमेदवारांशी आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी संवाद साधतील.

(छ) या विषयावर जिल्हा गुप्तवार्ता केंद्रामार्फतही (डीआयबी) नियमितपणे अभिप्राय मागवण्यात येतील.

(ज) जेथे जेथे अशा असुरक्षित क्षेत्रखंडांचा समुह असेल, तेथे जिल्हा निवडणूक अधिकारी खास त्यासाठीच तैनात केलेली पोलीस पथके / तुकड्यांची व्यवस्था करील आणि त्यांची सोयीस्कर ठिकाणांवर नियुक्त करील जेणेकरुन वेळेची कोणत्याही प्रकारे हानी न होता मतदानाच्या दिवशी कारवाईसाठी त्यांना सेवेत आणण्यात येईल. हा नेहमीच जिल्हा सुरक्षा योजनेचा भाग असेल.

(झ) महिला व तरुण मतदारांमध्ये भीती आणि अनुचित प्रभावाशिवाय मतदान करण्याबाबत जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे कारण ते केवळ बाहेरच्या लोकांद्वारेच नाही तर कुटुंबाच्याद्वारेही धाकपटशा आणि अवाजवी प्रभावाचे सहजपणे लक्ष्य बनतात.

(ञ) क्षेत्रातील धाकदपटशा बाबतची माहिती गोळा करण्यासाठी आणि क्षेत्रात आत्मविश्वास निर्मितीच्या उपाययोजना करण्यासाठी गाव पातळीवर / प्रभाग स्तरीय जनजागृती समूह (व्हीएजी/डब्ल्युएजी) तयार करणे.

(ट) मतदारांना रोख रक्कम / वस्तूरुपात लाच देण्यासाठी संशयित म्हणून निश्चित केलेल्या असुरक्षित ठिकाणी लक्ष्यित नैतिक मतदान जनजागृती अभियान हाती घेण्यात यावे.

(ठ) भरारी पथके, स्थिर संनिरीक्षण पथके व्हिडिओ पाहणी पथके यांच्याद्वारे २४ तास संनिरीक्षण केले जाईल याची अंमलबजावणी करणे.

**(ज) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलासाठी क्षेत्र वर्चस्व योजना आणि मतदानाच्या दिवशीच्या नियुक्ती.—**

(क) जिल्हा निवडणूक अधिकारी अशा असुरक्षित ठिकाणांची एक सूची केंद्रीय सशस्त्र दलाच्या कमांडर्स / सहायक कमांडर्सना देईल.

(ख) क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी जेव्हा केंद्रीय सशस्त्र पोलीस दल पोहोचेल तेव्हा अशा ठिकाणांवर विशेष लक्ष देण्यात येईल.

(ग) मतदानाच्या ६ ते ७ दिवस अगोदर जेथे मतदारांमध्ये लाच म्हणून रोख रक्कम / वस्तुंचे वाटप होण्याची शक्यता आहे अशा खर्चाच्या बाबतीत संवेदनशील अशा क्षेत्रखंडावर विशेष लक्ष द्यावे.

(घ) मतदानाच्या दिवशी, कमांडर / सहायक कमांडर आत्मविश्वास वाढविण्याचा / निर्माण करण्याचा उपाय अशा असुरक्षित क्षेत्रखंडांना भेट देतील.

(ङ.) भेटीदरम्यान त्यांना काही अडथळे आल्यास ते त्यांची नोंद घेतील आणि निवडणूक निर्णय अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी / पोलीस अधीक्षक / निरीक्षक / क्षेत्र अधिकारी यासारख्या कोणत्याही निवडणूक अधिकाऱ्यांना तात्काळ कळवतील आणि त्यांना ज्या वेळेस कळविले आहे त्या वेळेची नोंद ठेवतील.

(च) जेथे कोणत्याही मतदान केंद्रावर / केंद्रावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र तोडल्याची / पळवून नेल्याची घटना भूतकाळात घडली असेल, त्याठिकाणी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांची नेमणूक केली जाऊ शकते.

**(झ) मतदानाच्या दिवशी असुरक्षित क्षेत्रे / व्यक्तींचे संनियंत्रण.—**

असुरक्षित व्यक्ती जर कोणी असल्यास त्यांना भीती, धमकी किंवा धाकदपटशा न बाळगता मतदान करता येईल याची खात्री करण्यासाठी पुढील कृती करणे आवश्यक आहे.

(क) वितरण केंद्रावरून मतदान पथके पाठवण्याच्या वेळेस, निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित मतदान केंद्राध्यक्षाला मतदान केंद्राच्या क्षेत्रातील असुरक्षित ठिकाणांच्याबाबत संक्षिप्त माहिती देईल.

(ख) क्षेत्र अधिकारी विशेषतः असुरक्षित ठिकाणांच्या बाबत कोणत्याही वर्गामधून/वर्गांमधून असामान्यपणे कमी मतदानाची टक्केवारी, जर काही असेल तर असे दर्शवणारा एक अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांला सादर करील, ज्याचा उपयोग छाननी इत्यादी दरम्यान केला जाऊ शकतो.

(ग) मतदानाच्या दिवशी / दिवसांना, क्षेत्र दंडाधिकारी आणि फिरती दले कमीत कमी दोन वेळा ज्यांना असुरक्षित क्षेत्र म्हणून ओळखले गेले आहे आणि जेथे मतदारांना संभाव्य धाकदपटशा करण्यात आल्याचे अहवाल आहेत. अशा गावांना / पाड्यांना / वसतिस्थांनाना भेट देतील.

(घ) मतदाना दरम्यान निरीक्षक आणि इतर वरिष्ठ अधिकारी मतदान केंद्राला भेट देताना या समस्येवर विशेषपणे लक्ष देतील आणि कोणताही अवाजवी प्रभाव, धाकटपटशा / अडथळे कारणीभूत तर ठरत नाहीत हे शोधून काढतील.

(ङ.) पोलीस गस्ती पथके असुरक्षित ठिकाणांवर लक्ष ठेवतील आणि नियंत्रण कक्षाला कळवत राहतील. जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, सर्व मतदारांना कोणत्याही भीतीशिवाय मतदान करता यावे यासाठी मुक्त व सुरळीतपणे प्रवेश करता यावा याची खात्री करण्यासाठी पोलिसांची खांबांची कुंपणे (पिकेटस्) उभारण्यात येतील.

(च) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे कमांडर्स / सहायक कमांडर्स मतदानाच्या दिवशी आत्मविश्वास निर्मितीची उपाययोजना म्हणून अशा असुरक्षित क्षेत्रखंडांना भेट देतील. त्यांना काही अडथळे आल्यास ते त्याची दखल घेतील आणि निवडणूक निर्णय अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी / पोलीस अधीक्षक / क्षेत्र अधिकारी यांसारख्या कोणत्याही निवडणूक अधिकाऱ्यांना तात्काळ कळवतील आणि त्यांना कळविल्याच्या वेळेची नोंद घेतील.

(छ) असुरक्षित क्षेत्रांमध्ये पुरेशी दले तैनात करण्यात येतील.

**(ञ) मतदानानंतर निवडणूक निर्णय अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी / निरीक्षक यांची भूमिका.—**

(क) मतदानानंतर निवडणूक निर्णय अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी आपला अहवाल सादर करते वेळेस मोठ्या प्रमाणावरील धाकदपटशा / धमकी / अडथळा, जर काही असल्यास याबाबतची माहिती विचारात घेतील.

(ख) निरीक्षकांनी त्यांचे पूर्ण लक्ष असुरक्षितता मापनाच्या समस्येकडे द्यावे आणि प्रत्येक टप्प्यावर त्याची पडताळणी करावी. त्यांच्या अंतिम अहवालात या मुद्याचा विशेषत्वाने उल्लेख करण्यात येईल.

याव्यतिरिक्त मतदानानंतर, आयोगाने आदेशित केले असेल तर, ते नमुना १७ए ची आणि मतदान केंद्रामध्ये नमुना १७ए च्या छाननीच्या वेळी वापरलेल्या मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचे बारकाईने वाचन करतील.

**(ट) उत्तरदायित्व व गोपनीयता.—**

आयोग असा निदेश देतो की, असुरक्षिततेचे मापन आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रे आणि प्रत्येक टप्प्यावर पाठपुरावा करणे याबाबतची विविध नागरी (सिव्हिल) व पोलीस कर्मचाऱ्यांची जबाबदारी ही, प्रत्येक मतदान केंद्रांच्या / मतदारसंघाच्या संदर्भासह सुस्पष्टपणे निश्चित करण्यात येईल. याबाबतीत कोणत्याही नागरी (सिव्हील) / पोलीस कर्मचाऱ्यांनी कर्तव्यच्युती केल्यास, अशा बाबतीत शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी की, निवणुकांदरम्यान अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, असुरक्षितता मापन सराव, असुरक्षित क्षेत्रे, सुरक्षा बल तैनात करणे इत्यांदींशी संबंधित, कोणत्याही प्रकारचा तपशील देण्यासाठी कोणत्याही प्रकारची पत्रकार परिषद घेतली जाणार नाही, याबाबतीत क्षेत्रीय यंत्रणांना संवेदनशील करण्यात येईल. माध्यमांना असुरक्षिततेबाबतची कोणतीही माहीती, आवश्यक असल्यास, केवळ आयोगाद्वारे किंवा आयोगाच्या अनुदेशांवर राज्याच्या / संघराज्य क्षेत्राच्या संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारेच देण्यात येईल.

**(ठ) अहवालाची प्रपत्रे.—**

(क) क्षेत्र अधिकाऱ्यांनी अहवाल देणे

क्षेत्र अधिकारी पुढील प्रपत्रे काळजीपूर्वक भरतील :—

(एक) असुरक्षिततेचे मापन - २ (क्षेत्र अधिकारी) : क्षेत्र अधिकाऱ्यांद्वारे, असुरक्षित असलेली ठिकाणे / क्षेत्र खंड / मतदार प्रभाग यांची यादी तयार करण्यासाठीचे आणि धमकावण्यांची यादी करण्यासाठीचे मतदान केंद्रनिहाय प्रपत्र. **(जोडपत्र - दोन)**

(दोन) असुरक्षिततेचे मापन - ३ (क्षेत्र अधिकारी) : क्षेत्र अधिकाऱ्याने तयार केलेली असुरक्षित ठिकाणे / क्षेत्र खंड / मतदार प्रभाग यांची मतदार केंद्र निहाय यादी आणि धमकावणाऱ्यांच्या यादीचा सारांश. **(जोडपत्र-तीन)**

क्षेत्र अधिकारी, जेव्हा या ठिकाणच्या दौऱ्यावर असेल तेव्हा त्याने अशा प्रत्येक ठिकाणांसाठी / क्षेत्र खंडांसाठी ही प्रपत्रे भरणे आवश्यक आहे. क्षेत्र अधिकाऱ्यांने भरलेल्या प्रपत्राच्या प्रती जपून ठेवाव्यात आणि निवडणूक जाहिर झाल्याच्या ३ दिवसांच्या आत सर्व भरलेली प्रपत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करावीत. निश्चित केलेल्या विधानसभा मतदारसंह्यात अशा असुरक्षित लहान वस्ती (खेडी) किंवा गाव नसल्यास, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी ठाणे / गट स्तरावरील आणि उप विभागीय स्तरावरील क्षेत्र कर्मचाऱ्यांकडून आणि पोलीस अधीक्षकाकडून या जिल्ह्यात असे असुरक्षित गाव किंवा लहान वस्ती (खेडी) किंवा मतदार प्रभाग अस्तित्वात नाही/ निश्चित केलेले नाही असे प्रमाणपत्र घेतील आणि ते प्रमाणपत्र अंतिमतः मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास सादर करतील. अशी प्रमाणपत्रे निवडणुका जाहिर करण्याच्या दिवसापासून पाच दिवसांच्या आत पाठवण्यात येतील.

(ख) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा असुरक्षितता मापन अहवाल.—

मतदार संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी, संपूर्ण मतदारसंघाच्या वरील सर्व माहितीचे संकलन करील आणि असुरक्षिततेच्या मापनाला अंतिम स्वरुप देईल आणि ती माहिती, निवडणुका जाहीर होण्यापूर्वी ५ दिवसांच्या आत पुढील नमुन्यात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देईल आणि त्याची एक प्रत स्वतःकडे ठेवील :

**असुरक्षितता मापन प्रपत्र - ४** (निवडणूक निर्णय अधिकारी) :

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने असुरक्षितता आणि असुरक्षिततेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींची यादी यांचा सारांश देणे (जोडपत्र-चार)

(ग) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा असुरक्षिततेचा मापन अहवाल.—

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने त्याच धर्तीवर (RO प्रमाणेच), निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पाठवलेल्या असुरक्षिततेचे मापन - ४ या प्रपत्रांचे संकलन करावे आणि असुरक्षिततेचे मापन-५ तयार करावे आणि निवडणुका घोषित होण्यापूर्वी ७ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास उपलब्ध करुन द्यावे.

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने द्यावयाच्या अहवालाचे विहीत स्वरुप खालील प्रमाणे असेल.

**असुरक्षिततेचे मापन प्रपत्र - ५** (जिल्हा निवडणूक अधिकारी) :

असुरक्षितता निश्चितीबाबत अहवाल आणि जिल्हा स्तरावर करण्यात आलेली कार्यवाही (जोडपत्र - पाच).

(घ) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचा असुरक्षिततेचे मापन याचा अहवाल.—

मुख्य निवडणूक अधिकारी, असुरक्षिततेचे मापन प्रपत्र - ६ या प्रपत्रामध्ये राज्याचा एकत्रीकृत अहवाल भारताच्या निवडणूक आयोगास पाठवील. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने राज्याच्या सर्व जिल्ह्यांचे असुरक्षिततेचे मापन प्रपत्र - ५चे एका पुस्तकात संकलन करावे आणि निवडणुका जाहीर व्हायच्या १० दिवसांच्या आत, असुरक्षिततेचे मापन प्रपत्र ६ सह (मुख्य निवडणूक अधिकारी) आयोगास उपलब्ध करुन द्यावे.

- **असुरक्षितता मापन प्रपत्र - ६ (मुख्य निवडणूक अधिकारी) :** राज्याच्या असुरक्षितता मापनावरील अहवाल (जोडपत्र - सहा)

**(ड) राज्याचे कायदा व सुव्यवस्था पोर्टल कार्यान्वित करणे.—**

भारत निवडणूक आयोग याच्या दिनाक अनुदेश क्र. ४६४/अनुदेश/२०२३/ईपीएस, दिनांक ८ जून २०२३ यानुसार प्रत्येक राज्याने कायदा व सुव्यवस्था अहवाल - दोन (एल ओ आर - दोन) दररोज आयोगास पाठविणे अपेक्षित आहे. अहवालात पुढील गोष्टींचा एकत्रित सारांश आहे :—

(क) करण्यात आलेली प्रतिबंधात्मक कारवाई

(ख) जप्ती अहवाल - अवैध शस्त्रे, मद्य, अमलीपदार्थ इ.

(ग) असुरक्षित क्षेत्रे, व्यक्ती व धमकी देणारे (दहशत पसरवणारे) आणि करण्यात आलेली कारवाई.

(घ) अजामीनपात्र वॉरंट असलेली प्रकरणे.

(ङ) बेकायदा दारु गाळणाऱ्या हातभट्टीवाले व्यक्तींची यादी.

(च.) तडीपारीची प्रकरणात नावे असणारे.

(छ) गैरवर्तन करणाऱ्या व्यक्ती.

(ज) प्रसार माध्यमांशी संबंधित कोणताही अहवाल.

वर नमूद प्रत्येक प्रकरणाची तपशीलवार माहिती राज्याद्वारे प्राधान्याने कायदा व सुव्यवस्था पोर्टलवर देण्यात येईल. या पोर्टलवर, मतदान केंद्र निहाय, असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्तींचा तपशील आणि प्रशासनाद्वारे करण्यात आलेली कार्यवाही यांचे तपशील असणे अपेक्षित आहे. हे पोर्टल, मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिवसापूर्वी चार महिने कार्यान्वित झालेले असेल.

**७. असुरक्षितता मापनाची कायमर्यादा**

असुरक्षिततेचे मापन चार महिने आधीच सुरू होईल, जेणे करून, आयोगाकडून त्या परिस्थितीचा ज्यावेळी आढावा घेण्यात येईल तेव्हा जिल्हा दंडाधिकारी / पोलीस अधिक्षकांना त्याची पूर्ण जाणीव असेल. हे एक लक्षात घ्यावे की असुरक्षिततेचे मापन हे एक मतदानपूर्व काम आहे. म्हणून, सर्व निर्धारित केलेले कार्यक्रम वेळापत्रकानुसार पूर्ण करावयाच्या आहेत.

| अ.क्र.<br>(१) | कार्यक्रम<br>(२) | कालमर्यादा<br>(३) |
|---|---|---|
| १. | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने, प्रत्येक विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी / उप विभागीय दंडाधिकाऱ्याकडून जोडपत्र-एक अनुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघाची मूलभूत माहिती जमा करणे आणि तिचे संकलन करणे. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकाच्या सहा महिने आधी. |
| २. | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने जोडपत्र-१ अनुसार मूलभूत माहिती अद्ययावत करणे. | क्षेत्र अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यापूर्वी. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३. | क्षेत्र अधिकारी व पोलीस क्षेत्र अधिकाऱ्याची नियुक्ती | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकाच्या चार महिने आधी. |
| ४. | पोलीस ठाणे स्तरावर पोलीस क्षेत्र अधिकाऱ्याची नियुक्ती | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकाच्या चार महिने आधी. |
| ५. | क्षेत्र अधिकारी व पोलीस क्षेत्र अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने क्षेत्र अधिकाऱ्यांना मूलभूत माहिती सूपूर्द करणे. | मागील निवडणूकीच्या मतदानाच्या दिनाकांच्या चार महिने आधी. |
| ६. | भारत निवडणूक आयोगाद्वारे राज्याने चालवावयाच्या कायदा व सुव्यवस्था पोर्टलची निर्मिती. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनाकांच्या चार महिने आधी. |
| ७(ए) | जोडपत्र-दोन, तीन मध्ये असुरक्षित क्षेत्रे प्रभाग/गावे/लहान वस्त्या (खेडी) तसेच असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्ती इत्यादींची प्रारंभिक ओळख निश्चित करणे आणि असुरक्षितता मापन अहवाल सादर करणे. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकाच्या दोन महिने आधी. |
| ७(बी) | जोडपत्र-दोन, तीन मध्ये असुरक्षित क्षेत्रे प्रभाग/गावे/लहान वस्त्या (खेडी) तसेच असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्ती इत्यादींची अंतिम ओळख निश्चित करणे. | आयोगाने प्रसिद्धीपत्रक जारी केल्यानंतर आणि राजपत्रातील अधिसूचना जारी होण्यापूर्वी. |
| ८. | निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास (जोडपत्र-दोन, तीन मधील) प्रपत्रात असुरक्षितता मापनाचे सर्व अहवाल सादर करणे. | निवडणुका जाहीर झाल्याच्या ३ दिवसांच्या आत |
| ९(ए) | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने क्षेत्र अधिकाऱ्यांच्या अहवालांचे संकलन करणे आणि ते जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास सादर करणे (जोडपत्र – चार). | निवडणुका जाहीर झाल्याच्या ५ दिवसांच्या आत. |
| ९(बी) | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या असुरक्षितता मापनाबाबतच्या अहवालांचे संकलन करणे आणि ते मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास सादर करणे (जोडपत्र – पाच). | निवडणूका जाहीर झाल्याच्या ७ दिवसांच्या आत. |
| १०. | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने विधानसभा मतदाससंघामध्ये असुरक्षित गाव / क्षेत्र नसल्याबाबत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास प्रमाणपत्र सादर करावे. | निवडणूका जाहीर झाल्याच्या ७ दिवसांच्या आत |
| ११. | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे असुरक्षितता मापन अहवालांचे संकलन करणे आणि असुरक्षितता मापन अहवाल ६ (मुख्य निवडणूक अधिकारी) (जोडपत्र–पाच) मध्ये भारताच्या निवडणूक आयोगास सादर करणे. | निवडणुका जाहीर करण्याच्या १० दिवसांच्या आत |
| १२. | असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींविरूद्ध प्रतिबंधात्मक / कायदेशीर कारवाई पूर्ण करणे. | मतदानाच्या दिवसाच्या किमान ७ दिवसा आधी |
| १३. | अतिसुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या क्षेत्रांत जिल्हा दंडाधिकारी / पोलीस अधीक्षक ; उप जिल्हा दंडाधिकारी/पोलीस उप अधिक्षक ; तहसीलदार/ पोलीस निरीक्षक यांच्या आत्मविश्वास निर्माण करण्यासाठीच्या संयुक्त भेटींचे नियोजन करणे आणि भेटी देणे. | मतदानाच्या तीन आठवडे आधी |
| १४. | केंद्रीय सशस्त्र पोलीस बलाद्वारे मतदान पूर्व क्षेत्र वर्चस्व | मतदानाच्या दिवसाच्या किमान ३-५ दिवस आधी. |
| १५. | निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकारी /निवडणूक निर्णय अधिकारी, क्षेत्र अधिकारी, पोलीस यांनी असुरक्षित क्षेत्रांवर/व्यक्तींवर सक्त पहारा ठेवणे आणि त्यांचे संनियंत्रण करणे. | मतदानाच्या दिवशी. |

# जोडपत्र - एक

## असुरक्षितता मापन प्रपत्र - १

**क्षेत्र अधिकाऱ्याने असुरक्षिततेचे मापन करण्याचे काम हाती घेण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे त्याला / तिला (क्षेत्र अधिकाऱ्याला) द्यावयाची प्रत्येक विधानसभा मतदारसंघ प्रभागाची माहिती**

१. विधानसभा मतदारसंघ / क्षेत्रात मागील संसदीय निवडणुकांमध्ये नोंद झालेल्या निवडणुकविषयक अपराधांची संख्या (आवश्यक तेथे तपशील द्या.)

२. विधानसभा मतदारसंघ / क्षेत्रात मागील विधानसभा निवडणुकांमध्ये नोंद झालेल्या निवडणुकविषयक अपराधांची संख्या (आवश्यक तेथे तपशील द्या.)

३. विधानसभा मतदारसंघ / क्षेत्रात मागील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये नोंद झालेल्या निवडणुकविषयक अपराधांची संख्या (आवश्यक तेथे तपशील द्या.)

४. त्या क्षत्रात, मागील एका वर्षात नोंद झालेले गंभीर फौजदारी अपराध, जातीय संघर्ष आणि सामूहिक घटनांची संख्या, कोणतेही असल्यास (आवश्यक तेथे तपशील द्या.)

५. मागील संसदीय निवडणुकातील आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाच्या प्रकरणांची संख्या, कोणतेही असल्यास, (आवश्यक तेथे तपशील द्या.)

६. मागील विधानसभा निवडणुकातील आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाच्या प्रकरणांची संख्या, कोणतीही असल्यास (आवश्यक तेथे तपशील द्या.)

७. मागील संसदीय निवडणुकीत भरारी / संनिरीक्षण पथकांकडून स्थिरतिंक संनिरीक्षण पथकांद्वारे जप्त/खंडीत केलेल्या रोख रकमा/ वस्तू अशा घटनांची संख्या (आवश्यक तेथे तपशील द्या) आणि मागील संसदीय निवडणुकीतील असुरक्षित क्षेत्र खंडाचा तपशील

८. मागील विधानसभा निवडणुकातील भरारी / संनिरीक्षण पथक स्थिरतिंक संनिरीक्षण पथकांकडून जप्त/खंडीत केलेल्या रोख रकमा/ वस्तू अशा घटनांची संख्या (आवश्यक तेथे तपशील द्या) आणि मागील संसदीय निवडणुकातील असुरक्षित क्षेत्रातील खर्चाचा तपशील

९. संसद किंवा विधानसभेच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत किंवा कोणत्याही पोट-निवडणूकीत झालेल्या पुनर्मतदानाचे तपशील, कोणतेही असल्यास

१०. मागील संसदीय / विधानसभा आणि स्थानिक निवडणुकीतील प्रकरणांचा संबधितील प्रतिबंधात्मक कायद्याचे तपशील.

११. विधानसभा मतदारसंघातून / प्रभागातून सध्या तडीपार / स्थानबद्धतेत असणाऱ्या व्यक्तींची नावे.

१२. संबंधित राज्य उत्पादन शुल्क अधिनियमांतर्गत त्या क्षेत्रात नोंद झालेल्या महत्त्वाच्या प्रकरणांची संख्या आणि तपशील

(१) मागील संसदेच्या निवडणुकीतील.

(२) मागील विधानसभेच्या निवडणुकीतील.

(३) मागील वर्षभरातील.

१३. शस्त्रांशी संबंधित माहिती

१४. अंमली औषधिद्रव्ये व मनः प्रभावी पदार्थ अधिनियमाचे उल्लंघन केल्याच्या प्रकरणांचा तपशील

१५. निवडणुक विषयक प्रकरणातील क्षेत्राच्या हमीदारांची यादी.

१६. त्या क्षेत्रातील सराईत अपराध्यांची यादी (गुन्ह्यांच्या तपशीलासह)

१७. विधानसभा मतदारसंघ / प्रभागाच्या मतदार याद्यांच्या संबंधात कोणत्याही मतदानपूर्व तक्रारी असल्यास, त्यांचा तपशील.

१८. इतर कोणत्याही मतदानपूर्व तक्रारीचा तपशील.

१९. मागील ६ महिन्यात मतदारसंघात / प्रभागात आणि मतदारसंघातून / प्रभागातून सर्व सामान्यपणे होणाऱ्या स्थलांतरापेक्षा अधिक कोणतेही स्थलांतर झाले असल्यास त्यासंबंधीची माहिती.

२०. नेमून दिलेल्या मतदान केंद्रांतील मतदानासाठी आलेल्या मतदारांच्या संख्येच्या तपशिलांसह मागील संसदीय निवडणुकांमधील मतदानासाठी आलेल्या मतदारांची संख्या आणि टक्केवारी :

(१) पुरूष :

(२) स्त्रिया :

(३) एकूण :

२१. नेमून दिलेल्या मतदान केंद्रांतील मतदानासाठी आलेल्या मतदारांच्या संख्येच्या तपशिलांसह मागील विधानसभा निवडणूकांमधील मतदानासाठी आलेल्या मतदारांची संख्या आणि टक्केवारी.

(१) पुरूष :

(२) स्त्रिया :

(३) एकूण :

## जोडपत्र-२

### असुरक्षितता मापन-२ (व्ही एम - २) (क्षेत्र अधिकारी) : क्षेत्र अधिकाऱ्याने (मतदान केंद्रनिहाय) असुरक्षिततेचे मापन निर्धारीत करण्यासाठीचे प्रपत्र

**निवडणुकीचे नाव व वर्ष :**

विधानसभा मतदारसंघ / संसदीय मतदारसंघाचे नाव : क्षेत्राचे नाव :

मतदान केंद्र / ठिकाणाचा क्रमांक व नाव :

माहितीचा दिनांक :

### भाग - क

१. मागील एका वर्षात गावातील / क्षेत्रातील दोन किंवा अधिक जाती / समुदाय / गटांमध्ये संघर्ष घडलेले आहेत किंवा कसे ? (जर असल्यास, त्याचा तपशील)

२. ज्यामुळे दोन किंवा अधिक जाती समुदाय/गटांमध्ये मोठ्या प्रमाणावरील राजकीय शत्रुत्वास किंवा राजकीय भांडणास कारणीभूत ठरल्या आहेत किंवा कसे, गाव/क्षेत्रात अशा कोणत्याही घटना घडल्या आहेत (जर असल्यास, त्या घटना आणि सहभाग असलेल्या गटांचा तपशील)

३. मागील विधानसभा/संसदीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निवडणुकीशी संबंधित कोणतेही अपराध/घटना घडल्या आहेत किंवा कसे (होय असल्यास, त्यांचे तपशील)

४. मागील एका वर्षात गावात घडलेल्या/नोंद झालेल्या खून, बलात्कार, अत्याचार, दंगा यांसारख्या अतिगंभीर अपराधांचे आणि त्यात सहभागी असलेल्या व्यक्ती आणि ते घडलेल्या क्षेत्राचा तपशील.

५. मागील एक वर्षात तडीपार किंवा स्थानबद्ध करण्यात आलेले आहे अशा व्यक्तींची नावे

६. सध्या तडीपार किंवा स्थानबद्ध असलेल्या व्यक्तींची नावे

७. गाव/क्षेत्र आणि चालू राजकीय परिस्थिती विचारात घेता, संघर्ष घडण्याची शक्यता आहे किंवा कसे ? (जर असल्यास, त्याची कारणे आणि त्यात सहभागी असलेले गट)

८. कोणतीही जात/गट/परिवाराला अशी शंका आहे किंवा कसे की त्यांना मतदान करण्यास प्रतिबंध करण्यात येईल. (जर असल्यास, त्या जात/गट/परिवाराचे आणि ज्यांच्यापासून धोका आहे त्यांचा आणि त्यांना ज्या प्रकाराचा धोका आहे त्याचा तपशील)

९. जाती/समुदाय/गट/परिवारातील स्त्रियांना अशी भिती आहे किंवा कसे की, त्यांना मतदान करण्यास प्रतिबंध करण्यात येईल. (जर असल्यास अशा प्रकाराच्या व्यक्ती/परिवार/गटाचा आणि ज्याच्यापासून भिती आहे त्यांचा आणि कोणत्या कारणामुळे त्यांना भीती वाटते याचा तपशील)

१०. त्या क्षेत्रात गावात असा कोणताही संपर्क बिंदू निश्चित करण्यात आले आहेत किंवा कसे जेणे करून अशा घटनांचा ताबडतोब भाग शोधणे शक्य होईल. त्याचा तपशील

११. मागील दोन सार्वत्रिक निवडणूकदरम्यान उमेदवाराकडून गाव/क्षेत्रात रोख रक्कम, मद्य, भ्रमणध्वणी, रिचार्ज, जेवण इत्यादींच्या स्वरूपात मोह दाखण्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत किंवा कसे ? (कृपया स्त्रिया, तरूण मतदार, आणि अर्थिकदृष्या दुर्बल घटकांतील मतदार यांच्या संदर्भात तपासणी करा.)

१२. इतर तपशील कोणतेही असल्यास,

१३. वर नमूद केलेला आढावा ज्यांच्या उपस्थितील घेण्यात आला, त्या स्थानिक लोकांचा तपशील (त्यापैकी दोन वयस्क व्यक्ती, दोन स्त्रिया, आणि दोन तरूण आणि इतर लोक)

**टीप.**—जर माहिती देणारी व्यक्ती त्यांचा तपशील उघड करण्यास तयार असतील तरच हे तपशील नोंदविण्यात यावेत.

| क्र. | नाव | गावातील कोणत्या क्षेत्रातील रहिवासी आहे | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |

## भाग - ख

**(एक) असुरक्षित कुटुंबाची यादी :**

| अ.क्र. (१) | घर क्रमांक/कुटुंबाचे नाव/ कुटुंबातील सदस्यांची ओळख निश्चित करणारा इतर तपशील (२) | स्तंभ-२ मध्ये असुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या घर कुटुंबातील मतदारांची संख्या (३) | कुटुंबातील सदस्यांचा संपर्क क्रमांक, कोणताही असल्यास (४) | हाती घेतलेली/ प्रस्तावित कारवाई (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |

**(दोन) शारीरिक बळाच्या/पैशांच्या शक्तीचा वापर करून असुरक्षिततेसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींची यादी :**

| अ.क्र. (१) | व्यक्तींचे नाव (२) | व्यक्तींचा संपर्क क्रमांक आणि पत्ता (३) | धाकदपटशासाठी संभाव्य क्षेत्र/गाव/प्रभाग/असुरक्षित ठिकाण (४) | हाती घेतलेली/प्रस्तावित कारवाई (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |

## भाग-ग

### प्रमाणन

याद्वारे, असे प्रमाणित करण्यात येत आहे की, विधानसभा/संसदीय निवडणूका, २०— च्या दृष्टीकोनातून माझ्या क्षेत्रात समाविष्ट असलेले मतदान केंद्र क्रमांक ——————————, मतदान केंद्राचे नाव ————————————————— च्या क्षेत्रातील **"असुरक्षित"** आहे, असा कोणताही परिसर/क्षेत्रखंड/मतदार प्रभाग या नमुन्यात समाविष्ट करावयाचा राहून गेलेला नाही :

| | |
|---|---|
| क्षेत्र पोलीस अधिकाऱ्याची स्वाक्षरी | क्षेत्र अधिकाऱ्याची/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी |
| नाव : | नाव : |
| पदनाम : | पदनाम : |
| दूरध्वनी क्रमांक : | दूरध्वनी क्रमांक : |
| क्षेत्र क्रमांक : | क्षेत्र क्रमांक : |
| विधानसभा मतदारसंघ क्रमांक : | विधानसभा मतदारसंघ क्रमांक : |

## जोडपत्र–तीन

## असुरक्षितता मापन-३ (क्षेत्र अधिकारी)

## क्षेत्र अधिकाऱ्याने द्यावयाचा असुरक्षित ठिकाणे/क्षेत्रखंड/मतदार प्रभाग आणि दहशत पसरवणाऱ्या व्यक्तींच्या यादीचा मतदान केंद्रनिहाय सारांश

**(क्षेत्र निहाय)**

निवडणुकीचे नाव व वर्ष :

विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघाचे नाव :

क्षेत्राचे नाव :

| **अ.क्र.** | **विषय** | **एकूण संख्या** |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | क्षेत्र अधिकाऱ्याला नेमून दिलेल्या एकूण मतदान केंद्रांची संख्या | ....... पासून ...... पर्यंत |
| २. | सर्व मतदान केंद्रांना भेट देण्यासाठी लागलेल्या कालावधी | |
| ३. | भेट दिलेल्या एकूण मतदान केंद्रांची संख्या | |
| ४. | असुरक्षिततेने बाधित असलेल्या मतदान केंद्रांची संख्या | |
| ५. | सर्व मतदान केंद्राना एकत्रित करून असुरक्षित मतदार असल्याचे निश्चित केलेल्या एकूण कुटुंबांची संख्या. | |
| ६. | सर्व मतदान केंद्राना एकत्रित करून असुरक्षित मतदार म्हणून निश्चित केलेल्या एकूण मतदारांची संख्या. | |
| ७. | सर्व मतदान केंद्राना एकत्रित करून असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या. | |

क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी .........................

क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक ............................:

## जोडपत्र—चार

### असुरक्षितता मापन-४ (निवडणूक निर्णय अधिकारी)

### निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने द्यावयाची असुरक्षितता आणि असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तीची यादी यांचा सारांश (विधानसभा मतदारसंघ/संसदीय मतदारसंघ निहाय)

निवडणुकीचे नाव व वर्ष :

दिनांक :

जिल्ह्यांचे नाव :

विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघाचे नाव :

**क. विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघाचा असुरक्षितेबाबतचा सारांश**

| अ.क्र. (१) | असुरक्षिततेने प्रभावित असलेल्या मतदान केंद्राचा क्रमांक व नाव (२) | असुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या कुटुंब/घरांची संख्या (३) | स्तंभ ३ मध्ये असुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या मतदारांची (असुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या घरांमधील एकूण संख्या (४) | मतदान केंद्राच्या क्षेत्रातील असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्तींची संख्या (५) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| एकूण | | | | |

**ख. विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघमध्ये असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्तीची यादी**

| अ.क्र. | नाव | संपर्क क्रमांक व पत्ता | ज्या मतदान केंद्रांत असुरक्षिततेस कारणीभूत ठरत आहे आहे, त्या मतदान केंद्राचा क्रमांक व नाव | स्थान बध्द असलेले | करण्यात आलेली/प्रस्तावित कारवाई | | | | स्तंभ ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई न करण्याची कारणे | शेरा कोणताही असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तडीपार असलेले | अभिरक्षित/ कैद | इतर कोणतीही कारवाई (वर्णनासह) | कोणतीही कारवाई करण्यात आली नाही | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | |

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी . . . . . . . . . . . . . . . .

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे नाव . . . . . . . . . . . . . . .

## जोडपत्र–पाच

### असुरक्षितता मापन-५ (जिल्हा निवडणूक अधिकारी)

### असुरक्षिततेचे निर्धारण आणि जिल्हास्तरावर करण्यात आलेल्या कारवाईबाबतचा अहवाल (जिल्हानिहाय)

निवडणुकीचे नाव व वर्ष :

जिल्ह्याचे नाव : दिनांक :

**तक्ता क :**

**असुरक्षितता निश्चिती आणि करण्यात आलेली कारवाई.**

| अ.क्र. (१) | विधानसभा मतदारासंघाचा क्रमांक व नाव (२) | मतदान केंद्रांची एकूण संख्या (३) | ज्यामध्ये असुरक्षित कुटुंबाची ओळख निश्चित करण्यात आली आहेत, अशा मतदान केंद्रांची एकूण संख्या (४) | या मतदान केंद्राच्या क्षेत्रांमध्ये ओळख निश्चित केलेल्या असुरक्षित मतदारांची एकूण संख्या (५) | आत्मविश्वास वाढवण्यासाठी करण्यात आलेल्या उपायोजनांचा तपशील (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| एकूण | | | | | |

**तक्ता ख :**

**असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तीबाबतचा अहवाल**

| अ.क्र. | विधानसभा मतदारसंघाचे क्रमांक व नांव | ओळख निश्चित केलेल्या व्यक्तींची एकूण संख्या | स्तंभ ३ मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीविरूद्ध हाती घेतलेल्या कारवाईचा तपशील | | | | | स्तंभ ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई न करण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थान बद्ध | तडीपार | अभिरक्षित/ कैद | इतर कोणतीही कारवाई (वर्णनासह) | कोणतीही कारवाई करण्यात आली नाही | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १.<br>२.<br>३. | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची स्वाक्षरी . . . . . . . . . . . . . . .

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे नाव . . . . . . . . . . . . . . .

## जोडपत्र–सहा

### असुरक्षितता मापन-६ (मुख्य निवडणूक अधिकारी)

### राज्याचा असुरक्षितता मापनाबाबतचा अहवाल

निवडणूकीचे नाव व वर्ष :

| अ.क्र. | जिल्हा | विधानसभा/संसदीय मतदार-संघाचे नाव | मतदान केंद्रांची संख्या | असुरक्षितता निश्चित करणे | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रभावित मतदान केंद्रांची संख्या | असुरक्षित मतदारांची संख्या |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| एकूण | | | | | |

| ओळख निश्चित केलेल्या असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींची संख्या | स्तंभ ७ मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीविरूद्ध करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील | | | | स्तंभ ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई न करण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | प्रतिबंधात्मक कारवाई | तडीपार /स्थानबद्ध | इतर कोणताही कारवाई (वर्णनासह) | कोणतीही कारवाई करण्यात आली नाही | |
| (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| | | | | | |
| | | | | | |

✳ आत्मविश्वास वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनावरील टिपणी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.




भारत निर्वाचन आयोग

**Election Commission of India**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.